# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Karanja Rural**

**Date of Good Work done** :- **10/02/2022**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन कारंजा ग्रामीण हद्दीत ग्राम खेर्डा येथील महामार्गावर प्रवासी जेवणासाठी थांबले असता चोरट्यांनी त्यांच्या वाहनातून 1.98 लाख रुपये चोरून नेल्याची घटना घडली होती त्यावरून ठाणेदार गजानन धांदर व त्यांच्या पथकाने अवघ्या सहा तासात संशयित आरोपीस ताब्यात घेऊन त्यांच्याकडून 1.98 लाख रुपये जप्त केले.



दि. १०।२।२०२२

प्रेसनोट

पो.स्टे.कारंजा ग्रामीण येथे दिनांक ९/२/२०२२ रोजी तक्रारदार श्री रंगराव विठ्ठलराव नवगिरे रा.परभणी यांनी रिपोर्ट दिला की,मी सोबत पत्नी व ड्रायव्हर असे सकाळी परभणी वरुन चारचाकी वाहनाने खरेदीसाठी अमरावती येथे जात होतो त्यावेळी आम्ही खेर्डा ते अमरावती रोडवर खेर्डा पासून अंदाजे १ कि.मी.अंतरावर गाडी थांबवून गाडी रत्यावर लावून जेवणासाठी बाजूचे शेतामध्ये गेलो,त्यापुर्वी माझे पत्नीकडून गाडीचे मागील दरवाजा लॉक झालेला नव्हता. आम्ही बाजूचे शेतामधून जेवण करुन गाडीजवळ आलो असता गाडीतील पिशवीमध्ये खरेदीसाठी सोबत ठेवलेले १ लाख ९८ हजार रुपये पिशवीमध्ये दिसले नाही,ते कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्याचे लक्षात आले,वरुन पोलीसांना माहिति दिली.अश्या रिपोर्ट वरुन पो.स्टे.ला अप क्र.६६/२२ कलम ३७९ भा.द.वि.चा गुन्हा दाखल करण्यात येवून तपास सुरु करण्यात आला.

सदरचे तपासामध्ये घटनास्थळी भेट देवून पाहणी करुन आजूबाजूस विचारपूस करण्यात आली,तेव्हा घटना घडली त्यावेळी बाजूच्या शेतामध्ये गुराखी गुरे चारत असल्याबाबत माहिति मिळाली वरुन खेर्डा व आजूबाजूचे गावातील गुरे चारणारे गुराखी यांचा शोध घेण्यात आला व एकूण ८ लोकांना संशयीत म्हणून चौकशी करण्यात आली,त्यापैकी एक गुराखी नामे सुधाकर उकंडा काबंळे वय २५ वर्ष रा.खेर्डा हा उडवाउडवीची उत्तरे देवू लागला असता अधिक चौकशीवरुन तो त्याठिकाणी गुरे चारण्यासाठी आला होता हे समजले. त्यास विचारले असता त्याने दिशाभुल करणारी माहिति दिली की,मी तेथे हजर होतो त्यावेळी २ व्यक्ती हेल्मेट घालून मोटरसायकलवर तेथे आले व गाडीचे गेट खोलून बॅग घेवून गेले व माझेच हातातीली काठी घेवून मला धमकावून गेले की कोणाला काही सांगू नको. परंतू त्याचे बोलण्यामध्ये संशय आल्याने व त्याला दबाव टाकून विचारपूस केली असता त्याने गुन्हा स्वत केल्याचे कबुल केले व चोरी केलेली रक्कम १ लाख ९८ हजार त्याचे घरी लपवून ठेवले होते ते काढून दिले. **(कारंजा ग्रामीण पोलीसांनी ६ तासाचे आंत आरोपीस जेरबंद केले व रक्कम परत मिळवली याबाबत परभणी जिल्हातील तक्रारदार यांनी वाशिम जिल्हा पोलीसांचे खुप आभार मानले आहे)**

सदर गुन्हयाचा तपास मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चनसिंग साहेब,अपर पोलीस अधिक्षक श्री.भामरे साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा श्री.पांडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजानन धंदर यांचे नेतृत्वात तपासी अधिकारी सपोनि योगेश इंगळे,पोउपनि चंदन वानखेडे, एएसआय धनराज पवार, पोहेका महेंद्रसिंह रजोदिया, पॉ.सतिश जाधव,उमेश चव्हाण,पोना फिरोज भुरीवाले व इतर हे करीत आहेत.

पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन, कारंजा ग्रामीण